RNI No. MAHBIL /2009/35530

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार

वर्ष ४, अंक ४५]       शुक्रवार, जुलै २७, २०१८/श्रावण ५, शके १९४०       [पृष्ठे ३, किंमत : रुपये २३.००

**असाधारण क्रमांक ७७**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

**अनुक्रमणिका**


| | पृष्ठे |
|---|---|
| **सन २०१८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४४.—** महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ यात आणखी सुधारणा करण्यासाठी, आणि महाराष्ट्र जमीन महसूल (विवक्षित भूमिधारींचा भोगवटादार-वर्ग एक मध्ये अंतर्भाव करण्यासाठी परवानगी देण्याबाबत) नियम, १९६८ याचे निरसन करण्यासाठी अधिनियम .. .. | १ ते ३ |


दिनांक २५ जुलै २०१८ रोजी मा. राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**राजेन्द्र ग. भागवत,**
प्रभारी सचिव (विधि विधान),
महाराष्ट्र शासन,
विधि व न्याय विभाग.

---

**सन २०१८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४४.**

(माननीय राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर "**महाराष्ट्र शासन राजपत्रात**" दिनांक २७ जुलै २०१८ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

**महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ यात आणखी सुधारणा करण्यासाठी, आणि महाराष्ट्र जमीन महसूल (विवक्षित भूमिधारींचा भोगवटादार-वर्ग एक मध्ये अंतर्भाव करण्यासाठी परवानगी देण्याबाबत) नियम, १९६८ याचे निरसन करण्यासाठी अधिनियम.**

१९६६ चा महा. ४१.

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते ;

**आणि ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ यात आणखी सुधारणा करण्यासाठी, आणि महाराष्ट्र जमीन महसूल (विवक्षित भूमिधारींचा भोगवटादार-वर्ग एक मध्ये अंतर्भाव करण्यासाठी परवानगी देण्याबाबत) नियम, १९६८ याचे निरसन करण्यासाठी महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तातडीने कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली होती ;

आणि, म्हणून, त्यांनी दिनांक २१ एप्रिल २०१८ रोजी महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (सुधारणा) आणि महाराष्ट्र जमीन महसूल (विवक्षित भूमिधारींचा भोगवटादार-वर्ग एक मध्ये अंतर्भाव करण्यासाठी परवानगी देण्याबाबत) नियम (निरसन) अध्यादेश, २०१८, हा प्रख्यापित केला होता ; २०१८ चा महा. अध्या. ९.

**आणि ज्याअर्थी,** उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रुपांतर करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या एकोणसत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

## प्रकरण एक

## **प्रारंभिक**

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (सुधारणा) आणि महाराष्ट्र जमीन महसूल (विवक्षित भूमिधारींचा भोगवटादार-वर्ग एक मध्ये अंतर्भाव करण्यासाठी परवानगी देण्याबाबत) नियम (निरसन) अधिनियम, २०१८, असे म्हणावे.

(२) तो, दिनांक २१ एप्रिल २०१८ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

## प्रकरण दोन

## **महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ याची सुधारणा**

सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ याच्या कलम २९ ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ (यात यापुढे या प्रकरणात ज्याचा निर्देश " जमीन महसूल संहिता " असा करण्यात आला आहे) याच्या कलम २९ मध्ये,— १९६६ चा महा. ४१.

(एक) पोट-कलम (२) मधील खंड (क) ऐवजी, पुढील खंड दाखल करण्यात येईल :—

" (क) २१ एप्रिल २०१८ रोजी म्हणजेच महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (सुधारणा) आणि महाराष्ट्र जमीन महसूल (विवक्षित भूमिधारींचा भोगवटादार-वर्ग एक मध्ये अंतर्भाव करण्यासाठी परवानगी देण्याबाबत) नियम (निरसन) अधिनियम, २०१८ याच्या प्रारंभाच्या दिनांकास ज्या व्यक्ती हस्तांतरण करण्याच्या हक्कावरील निर्बंधासह भूमिस्वामी हक्कान्वये विदर्भात किंवा भूमिधारी हक्कांन्वये विदर्भातील कोणत्याही स्थानिक क्षेत्रात जमीन धारण करीत होत्या, अशा व्यक्ती. "; २०१८ चा महा. ४४.

(दोन) पोट-कलम (३) च्या खंड (ख) मधील, उप-खंड (एक) वगळण्यात येईल.

सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ यामध्ये कलम २४६अ समाविष्ट करणे.

**३.** जमीन महसूल संहितेच्या कलम २४६ नंतर, पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल :—

भोगवटादार–वर्ग एक चे हक्क बहाल करण्यासाठी प्रलंबित असलेले अर्ज.

" **२४६अ.** भोगवटादार-वर्ग एक म्हणून जमीन धारण करण्याबाबतच्या परवानगीकरिता, २१ एप्रिल २०१८ रोजी म्हणजेच महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (सुधारणा) आणि महाराष्ट्र जमीन महसूल (विवक्षित भूमिधारींचा भोगवटादार-वर्ग एक मध्ये अंतर्भाव करण्यासाठी परवानगी देण्याबाबत) नियम (निरसन) अधिनियम, २०१८ याच्या प्रारंभाच्या दिनांकास, कोणत्याही महसूल अधिकाऱ्यापुढे किंवा राज्य शासनापुढे कोणत्याही व्यक्तीचा प्रलंबित असलेला कोणताही अर्ज, मग तो अपील अर्ज, पुनरीक्षण अर्ज किंवा अन्य अर्ज असो, उक्त अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापासून संपुष्टात आला आहे, असे समजण्यात येईल. २०१८ चा महा. ४४.

**स्पष्टीकरण.—**या कलमाच्या प्रयोजनार्थ, " जमीन " या शब्दप्रयोगाचा अर्थ, हक्क हस्तांतरण करण्याच्या हक्कावरील निर्बंधासह भूमिस्वामी हक्कान्वये विदर्भातील कोणत्याही स्थानिक क्षेत्रात किंवा भूमिधारी हक्कान्वये विदर्भातील कोणत्याही स्थानिक क्षेत्रात, धारण केलेली जमीन, असा असेल. ".

सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ याच्या कलम ३२८ ची सुधारणा.

**४.** जमीन महसूल संहितेच्या कलम ३२८ च्या पोट-कलम (२) मधील खंड (नऊ) वगळण्यात येईल.

प्रकरण तीन

## महाराष्ट्र जमीन महसूल (विवक्षित भूमिधारींचा भोगवटादार-वर्ग एक मध्ये अंतर्भाव करण्यासाठी परवानगी देण्याबाबत) नियम, १९६८ याचे निरसन

**५.** महाराष्ट्र जमीन महसूल (विवक्षित भूमिधारींचा भोगवटादार-वर्ग एक मध्ये अंतर्भाव करण्यासाठी परवानगी देण्याबाबत) नियम, १९६८ हा, निरसित करण्यात येत आहे. महाराष्ट्र जमीन महसूल (विवक्षित भूमिधारींचा भोगवटादार-वर्ग एक मध्ये अंतर्भाव करण्यासाठी परवानगी देण्याबाबत) नियम, १९६८ याचे निरसन.

प्रकरण चार

## संकीर्ण

१९६६ चा महा. ४१. **६.** (१) या अधिनियमाद्वारे सुधारणा केलेल्या महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ याच्या तरतुदी अंमलात आणताना कोणतीही अडचण उद्‌भवल्यास, राज्य शासनास, प्रसंगानुरूप, **राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे अशी अडचण दूर करण्याच्या प्रयोजनार्थ, या अधिनियमाद्वारे सुधारणा केलेल्या उक्त संहितेच्या तरतुदींशी विसंगत नसणारी कोणतीही गोष्ट करता येईल : अडचणी दूर करण्याचा अधिकार.

परंतु, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापासून दोन वर्षांचा कालावधी समाप्त झाल्यानंतर असा कोणताही आदेश काढण्यात येणार नाही.

(२) पोट-कलम (१) अन्वये काढण्यात आलेला प्रत्येक आदेश, तो काढण्यात आल्यानंतर, शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहासमोर ठेवण्यात येईल.

२०१८ चा महा. अध्या. ९. **७.** (१) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (सुधारणा) आणि महाराष्ट्र जमीन महसूल (विवक्षित भूमिधारींचा भोगवटादार-वर्ग एक मध्ये अंतर्भाव करण्यासाठी परवानगी देण्याबाबत) नियम (निरसन) अध्यादेश, २०१८ हा, याद्वारे, निरसित करण्यात येत आहे. सन २०१८ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ९ याचे निरसन व व्यावृत्ती.

१९६६ चा महा. ४१. (२) अशा प्रकारे निरसन झाले असले तरी, उक्त अध्यादेशाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ याच्या संबंधित तरतुदींन्वये करण्यात आलेली कोणतीही कृती किंवा कोणतीही कार्यवाही (काढण्यात आलेली कोणतीही अधिसूचना किंवा दिलेला आदेश यांसह) ही, या अधिनियमान्वये सुधारणा करण्यात आलेल्या उक्त संहितेच्या संबंधित तरतुदींन्वये करण्यात आलेली कोणतीही कृती, कार्यवाही किंवा, यथास्थिती, काढण्यात आलेली अधिसूचना किंवा दिलेला आदेश असल्याचे मानण्यात येईल.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY I/C DIRECTOR SHRI MANOHAR SHANKAR GAIKWAD, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : I/C DIRECTOR SHRI MANOHAR SHANKAR GAIKWAD.

RNI No. MAHENG /2009/35528

# महाराष्ट्र शासन राजपत्र
## असाधारण भाग आठ

वर्ष ४, अंक ५८] शुक्रवार, जुलै २७, २०१८/श्रावण ५, शके १९४० [पृष्ठे ३, किंमत : रुपये २७.००

असाधारण क्रमांक ११८

प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम आणि विधि व न्याय विभागाकडून आलेली विधेयके (इंग्रजी अनुवाद).

In pursuance of clause (*3*) of article 348 of the Constitution of India, the following translation in English of the Maharashtra Land Revenue Code (Amendment) and the Maharashtra Land Revenue (Inclusion of certain *Bhumidharis* in Occupants–Class I Permission) Rules (Repeal) Act, 2018 (Mah. Act No. XLIV of 2018), is hereby published under the authority of the Governor.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

RAJENDRA G. BHAGWAT,
I/c. Secretary (Legislation) to Government,
Law and Judiciary Department.

---

## MAHARASHTRA ACT No. XLIV OF 2018

*(First published, after having received the assent of the Governor in the* " Maharashtra Government Gazette ", on the 27th July 2018.)

An Act further to amend the Maharashtra Land Revenue Code, 1966 and to repeal the Maharashtra Land Revenue (Inclusion of certain *Bhumidharis* in Occupants—Class I Permission) Rules,1968.

WHEREAS both Houses of the State Legislature were not in session;

AND WHEREAS the Governor of Maharashtra was satisfied that circumstances existed which rendered it necessary for him to take immediate action further to amend the Maharashtra Land Revenue Code, 1966 and to repeal the Maharashtra Land Revenue (Inclusion of certain *Bhumidharis* in Occupants—Class I Permission) Rules, 1968, for the purposes hereinafter appearing ; and therefore, promulgated the Maharashtra Land Revenue Code (Amendment) and the Maharashtra Land Revenue (Inclusion of certain *Bhumidharis* in Occupants—Class I Permission) Rules (Repeal) Ordinance, 2018 on the 21st April 2018 ;

Mah. XLI of 1966.

Mah. Ord. IX of 2018.

AND WHEREAS it is expedient to replace the said Ordinance, by an Act of the State Legislature; it is hereby enacted in the Sixty-ninth Year of the Republic of India, as Follows :—

## CHAPTER I

### PRELIMINARY

Short title and commencement.

**1.** (*1*) This Act may be called the Maharashtra Land Revenue Code (Amendment) and the Maharashtra Land Revenue (Inclusion of certain *Bhumidharis* in Occupants—Class I Permission) Rules (Repeal) Act, 2018.

(*2*) It shall be deemed to have come into force with effect from the 21st April 2018.

## CHAPTER II

### AMENDMENTS TO THE MAHARASHTRA LAND REVENUE CODE, 1966.

Amendment of section 29 of Mah. XLI of 1966.

**2.** In section 29 of the Maharashtra Land Revenue Code, 1966 (hereinafter, in this Chapter, referred to as "the Land Revenue Code"),— Mah. XLI of 1966.

(*i*) in sub-section (*2*), for clause (*c*), the following clause shall be substituted, namely :—

"(*c*) on the 21st April 2018, being the date of commencement of the Maharashtra Land Revenue Code (Amendment) and the Maharashtra Land Revenue (Inclusion of certain *Bhumidharis* in Occupants—Class I Permission) Rules (Repeal) Act, 2018, were holding the land in Vidarbha in *Bhumiswami* rights with restrictions on right to transfer, or in *Bhumidhari* rights in any local area in Vidarbha."; Mah. XLIV of 2018.

(*ii*) in sub-section (*3*), in clause (*b*), sub-clause (*i*) shall be deleted.

Insertion of section 246A in Mah. XLI of 1966.

**3.** After section 246 of the Land Revenue Code, the following section shall be inserted, namely :—

Pending applications for conferral of Occupants—Class I Rights.

**"246A.** Any application by a person pending before any revenue officer or, before the State Government, whether in appeal, revision or otherwise, on the 21st April 2018, being the date of commencement of the Maharashtra Land Revenue Code (Amendment) and the Maharashtra Land Revenue (Inclusion of certain *Bhumidharis* in Occupants—Class I Permission) Rules (Repeal) Act, 2018, for permission to hold the land as Occupants—Class I, shall, with effect from the date of commencement of the said Act be treated as closed. Mah. XLIV of 2018.

Explanation.— For the purposes of this section, the expression "land" shall mean the land in any local area in Vidarbha, held in *Bhumiswami* rights with restrictions on right to transfer, or in *Bhumidhari* rights in any local area in Vidarbha.".

Amendment of section 328 of Mah. XLI of 1966.

**4.** In section 328 of the Land Revenue Code, in sub-section (*2*), clause (*ix*) shall be deleted.

## CHAPTER III

### REPEAL OF THE MAHARASHTRA LAND REVENUE (INCLUSION OF CERTAIN BHUMIDHARIS IN OCCUPANTS—CLASS I PERMISSION) RULES, 1968.

Repeal of the Maharashtra Land Revenue (Inclusion of certain *Bhumidharis* in Occupants—Class I Permission) Rules, 1968.

**5.** The Maharashtra Land Revenue (Inclusion of certain *Bhumidharis* in Occupants—Class I Permission) Rules, 1968, shall stand repealed.

## CHAPTER IV

### MISCELLANEOUS

Power to remove difficulty.

Mah. XLI of 1966.

**6.** (*1*) If any difficulty arises in giving effect to the provisions of the Maharashtra Land Revenue Code, 1966, as amended by this Act, the State Government may, by order published in the *Official Gazette*, as the occasion may arise, make such provisions, not inconsistent with the provisions of the said Code, as amended by this Act, as may appear it to be necessary or expedient for the purpose of removing such difficulty :

Provided that, no such order shall be made after the expiry of a period of two years from the date of commencement of this Act.

(*2*) Every order made under sub-section (*1*) shall be laid, as soon as may be, after it is made, before each House of the State Legislature.

Repeal of Mah. Ord. IX of 2018 and saving.

Mah. Ord. IX of 2018.

**7.** (*1*) The Maharashtra Land Revenue Code (Amendment) and the Maharashtra Land Revenue (Inclusion of certain *Bhumidharis* in Occupants-Class I Permission) Rules (Repeal) Ordinance, 2018, is hereby repealed.

Mah. XLI of 1966.

(*2*) Notwithstanding such repeal, anything done or any action taken (including any notification or order issued) under the corresponding provisions of the Maharashtra Land Revenue Code, 1966 as amended by the said Ordinance, shall be deemed to have been done, taken or, as the case may be, issued under the corresponding provisions of the said Code, as amended by this Act.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY I/C DIRECTOR SHRI MANOHAR SHANKAR GAIKWAD, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 EDITOR : I/C DIRECTOR SHRI MANOHAR SHANKAR GAIKWAD.